**श्री. विवेक रमेश सोनूने,तत्कालीन अध्यक्ष,**
**जिल्हा ग्राहक तक्रार निवारण आयोग यांना**
**मा. पद्मनाभन आयोगाच्या फरकाची रक्कम**
**अदा करण्याबाबत.**

**महाराष्ट्र शासन**
**अन्न नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण विभाग**
**शासन निर्णय क्रमांक : ग्रासंअ-२०२४/प्र.क्र.५७ (ई- ८०१५९४)/ग्रा.सं.४**
हुतात्मा राजगुरु चौक,मादाम कामा मार्ग,
मंत्रालय (विस्तार), मुंबई-४०० ०३२
दिनांक: १० एप्रिल, २०२६

वाचा : १. अन्न, नागरी पुरवठा व ग्राहक सरंक्षण विभाग, शासन निर्णय क्र.न्यायप्र२०१८/प्र.क्र.४९/ ग्रासं-४, दि. ३०.०६.२०१८
२. राज्य ग्राहक तक्रार निवारण आयोग, मुंबई यांचे पत्र क्र. राआ/आस्था/ पद्म.आयोग/ विरसो/२०२५/६०६१, दि. ०९.१०.२०२५
३. जिल्हा ग्राहक तक्रार निवारण आयोग, अकोला यांचे पत्र क्र. जिग्रातनिमं/अ /लेखा/ २०२५/४९५, दि. २२.१२.२०२५
४. जिल्हा ग्राहक तक्रार निवारण आयोग, बुलढाणा यांचे पत्र क्र. जिग्रामंबुं/लेखा/ ध.पो./२०१८/९३९, दि. १८.०८.२०१८.

**प्रस्तावना :**

मा. उच्च न्यायालय, मुंबई येथे दाखल याचिका क्र.१२१३/२०१७ व स्टॅम्प क्र. १०१०५ /२०१८ या प्रकरणांच्या अनुषंगाने शासनाच्या वाचा क्र. १ येथील शासन निर्णय दि.३०.०६.२०१८ नुसार जिल्हा ग्राहक आयोगाच्या एकूण ७१ आजी /माजी अध्यक्षांना शेट्टी आयोग व पद्मनाभन समितीच्या शिफारशीच्या सुधारीत वेतन श्रेणीच्या फरकानुसार रु.२,८३.३६,४८२/- इतकी रक्कम अदा करण्यासाठी उपलब्ध करुन देण्यात आलेली आहे. सदर शासन निर्णयानुसार श्री. विवेक सोनूने यांना रु.१,२७,८०३/- इतकी फरकाची अंदाजित रक्कम अदा करण्याबाबत मान्यता देण्यात आली होती. तथापि, श्री. सोनूने यांची जिल्हा ग्राहक तक्रार निवारण आयोग, बुलढाणा येथील दि. ०१.०१.२०१४ ते दि. ११.११.२०१४ या कालावधीमध्ये देय रक्कम रु. १,२०,३१६/- इतकी असल्याने सदर रक्कम जिल्हा ग्राहक तक्रार निवारण आयोग, बुलढाणा यांनी अदा केली आहे.

२.	सद्यस्थितीत श्री. विवेक सोनूने यांना जिल्हा ग्राहक तक्रार निवारण आयोग, अकोला येथे कार्यरत कालावधी दि. १२.२.२०१३ ते दि. ३१.१२.२०१३ मधील रु.१,१३,१०७/- इतकी रक्कम देण्यात आली नसलेबाबत राज्य ग्राहक तक्रार निवारण आयोगाने दि. ०९.१०.२०२५ च्या पत्रान्वये कळविले आहे. सदर फरकाची रक्कम अदा करण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती.

**शासन निर्णय :**

श्री. विवेक रमेश सोनूने, माजी अध्यक्ष, जिल्हा ग्राहक तक्रार निवारण आयोग, अकोला यांना शेट्टी आयोग व पद्मनाभन समितीच्या शिफारशीच्या सुधारीत वेतन श्रेणीच्या फरकानुसार दि. १२.०२.२०१३ ते दि. ३१.१२.२०१३ या कालावधीची देय असलेली फरकाची रक्कम रु. १,१३,१०७/- (अक्षरी एक लाख तेरा हजार एकशे सात फक्त) अदा करण्यास मान्यता देण्यात येत आहे.

२.	सदर शासन निर्णय वित्त विभाग, शासन निर्णय, क्र.विअप्र-२०१३/प्र.क्र.३० /२०१३ /विनियम भाग-२, दिनांक १७.४.२०१५ नुसार वित्तीय अधिकार नियम पुस्तीका, १९७८, भाग-पहिला उपविभाग-एक महाराष्ट्र अ.क्र.५, नियम क्र. ३९ (ब) टीप-५ मधील अटी व शर्तींच्या अधिन राहून प्रशासकीय विभागास प्रदान करण्यात आलेल्या अधिकारानुसार निर्गमित करण्यात येत आहे.

३.	उपरोक्त बाबींवर होणारा खर्च मागणी क्र. एम-२, मुख्य लेखाशिर्ष २४०८, अन्न साठवण व वखार साठवण, ग्राहक संरक्षण अधिनियम, १९८६ अन्वये राज्य परिषद, राज्य आयोग व जिल्हा मंच स्थापन करणे, (०४) (०२) मुफसल (अनिवार्य), २४०८०२६२, ०१ वेतन व भत्ते या लेखाशीर्षाखाली सन २०२६-२७ या वर्षासाठी मंजूर अनुदानातून भागविण्यात यावा.

४.	सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेताक क्र. २०२६०४१०१७५४५११००६ असा आहे. हा शासन निर्णय डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन निर्गमित करण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

PRAMOD ABAJI PATIL

Digitally signed by PRAMOD ABAJI PATIL
DN: c=IN, o=GOVERNMENT OF MAHARASHTRA, ou=FCSCPD, 2.5.4.20=4A3B99D57D257E955ED34CA51DB1F3C521002555E05C455E86F A1C9C82A1D82B, postalCode=400032, st=Maharashtra, serialNumber=68D5A8ABFFDD75CBA24301AA39C12B40983F304D726779 6A32B42D4D558F1A1F, cn=PRAMOD ABAJI PATIL
Date: 2026.04.10 17:55:50 +05'30'

**(प्रमोद पाटील)**
**उप सचिव, महाराष्ट्र शासन**

**प्रति,**

१. अपर मुख्य सचिव, अन्न,नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण विभाग, मंत्रालय, मुंबई.
२. अध्यक्ष, राज्य ग्राहक तक्रार निवारण आयोग, मुंबई.
३. उप सचिव, अन्न,नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण विभाग, मंत्रालय, मुंबई.

४. वित्तीय सल्लागार व उप सचिव, अन्न, नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण विभाग, मुंबई.

५. महालेखापाल, महाराष्ट्र-१/२ (लेखा परीक्षा) (लेखा व अनुज्ञेयता), मुंबई/नागपूर.

६. निवासी लेखा परीक्षा अधिकारी, मुंबई.

७. जिल्हा कोषागार अधिकारी, अकोला/ बुलढाणा

८. प्रबंधक (प्रशासन), राज्य ग्राहक तक्रार निवारण आयोग, मुंबई.

९. प्रबंधक, जिल्हा ग्राहक तक्रार निवारण आयोग, अकोला/ बुलढाणा.

१०. श्री. विवेक रमेश सोनूने,तत्कालीन अध्यक्ष, जिल्हा ग्राहक तक्रार निवारण आयोग (राज्य आयोग, मुंबई मार्फत)

११.निवडनस्ती (ग्रासं-४)